**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**

**मा. "ड" प्रभाग समिती**

**विशेष सभा कार्यपत्रिका क्र. १**

**सभावृत्तांत**

**दिनांक – ०९ /०५/२०१९** **वेळ : दु.१२.०० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. **ड** प्रभाग समितीची मा.सभापती निवडीची विशेष सभा **गुरुवार** दिनांक **०९/०५/२०१९** रोजी **दु.१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह, मुख्य इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८ या ठिकाणी **मा.राजेंद्र निंबाळकर (भा.प्र.से)** पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका, यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.आंगोळकर सागर सुनिल

२) मा.मुंढे उषा अंकुश

३) मा.कदम शशिकांत गणपत

४) मा.लोखंडे चंदा राजू

-----

याशिवाय मा.खोराटे विजय एकनाथ - क्षेत्रीय अधिकारी, मा.सिताराम देवचंद बहुरे - प्रशासन अधिकारी ड प्रभाग समिती कार्यालय, हे उपस्थित होते.

-------

**पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा** – सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. **ड** प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**प्रभाग समिती सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.**

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )** – मा. **ड** प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणूक करणेकामी एकूण २ **(दोन)** नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे –

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. कदम शशिकांत गणपत | मा. सागर सुनिल आंगोळकर | मा. मुंढे उषा अंकुश |
| २ | मा. कदम शशिकांत गणपत | मा. शत्रुघ्न सिताराम काटे | मा. लोखंडे चंदा राजू |

(प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेली एकुण २ **(दोन)** नामनिर्देशन पत्रे पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली.)

( मा.पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

| | |
|---|---|
| **पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा** | मा. **ड** प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एका उमेदवाराच्या २ **(दोन)** नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असुन त्यामध्ये मा. **ड** प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.कदम शशिकांत गणपत** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.<br><br>सबब मा. **ड** प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.कदम शशिकांत गणपत** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे ), नियम २००७ मधील नियम ६ (१) नुसार **मा.कदम शशिकांत गणपत** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ड** प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या **बिनविरोध** निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे. |

**सही/-**
**(राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)**
**पिठासीन अधिकारी तथा**
अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा
“ड” प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८**
**मा.ड प्रभाग समिती**
**विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक ०१**

ठराव क्रमांक – १ | विषय क्रमांक – १

दिनांक –०९/०५/२०१९ | विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. **ड** प्रभाग समिती सभापती पदाकरिता **मा.कदम शशिकांत गणपत** या उमेदवाराने एकूण २ **(दोन)** नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून सदर नामनिर्देशनपत्रे छाननीमध्ये वैध ठरलेली आहेत. सबब, **ड** प्रभाग समिती सभापती पदाकरीता **मा.कदम शशिकांत गणपत** हे एकच वैध उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ड** प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या **बिनविरोध** निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**सही/-**
**(राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)**
**पिठासीन अधिकारी तथा**
अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा
"ड" प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी-१७
क्रमांक : डक्षेका/१३/कावि/३४ /२०१९
दिनांक :०९/०५/२०१९

**सही/-**
**प्रशासन अधिकारी**
तथा सचिव सभा शाखा
"ड" प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.